॥ श्री ॥
॥ बाबा ॥

बाबांचा मिळेल सर्वांना आधार
जेव्हा झोकून दयाल सारा भार
होता बाबांची कृपा एकवार
अढळ आहे ती कवणावर ॥ धृ.॥

बाबांकडे काही मूढ येती
दुःख आपुले हरायला
खाऊन पिऊन लोळून भरपूर
परमानंद लुटायला
होता कामे बाबा नामे
विसरुनी जाती तयाला
कसे राहतील बाबा तुमच्याजवळी
विचारा हो मनाला
मिळते का उत्तर समाधानाचे
त्यावरुनी धडा घ्याना ॥ 1 ॥

बाबांशी एकरुप असे व्हावे
स्मरता डोळा पाणी यावे
विरहाचे दुःखाश्रु आणि
आनंदाचे आनंदाश्रु
मिळून दोघे करतील भक्ती
तयारी मोक्षपदाची
गुरु महान या जगतात
आहे त्रिवार सत्य
येऊन शरण जावे मीपण
हीच धरुया आस ॥ 2 ॥

बाबा नाही योग्यता माझी
उपदेश कोणा करण्याची
जे जे सुचते मनी येते
ते ते कागदावरी उठते
आहे हो मी तान्हे बाळ तुमचे
मजसी करु नका दुर तुम्ही
लहान तोंडी मोठा घास
होतो आहे बाबा माझा
तोंडही तुमचे घासही तुमचा
मी आहे माध्यम ॥ 3 ॥

★★★★★